सन १९२८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं. ३८

प्राचीन व अर्वाचीन इतिहासाचें आस्थापूर्वक अध्ययन करणारांस प्रेमपूर्वक अर्पण केला आहे.

# आमची परळीची यात्रा.

संपादक व प्रकाशकः
यशवंत राजाराम गुप्ते,
बी. ए., एम्. आर. ए. एस्.,
माजी असि. सुप. फॉर एपिग्राफी.


[ सर्व हक्क संपादक व प्रकाशक यांनीं स्वाधीन ठेविले आहेत. ]

REFBK-0003795

सन १९२८

—×○×—

किंमत ४ आणे.


REFBK-0003795

परळी येथील केदारेश्वराचे देवळांतील नक्षीकाम. पृ० ९




श्रीसमर्थ रामदासस्वामी.

# प्रस्तावना.

" आमची परळीची यात्रा " हा लेख प्रथम महाराष्ट्र-साहित्य, वर्ष ६, अंक ३, यांत प्रसिद्ध झाला. तो बाहेर पडतांच प्रो. पोतदार यांचें " इतक्या चटकदार रीतीनें पुराणवस्तुसंशोधनाचें शिक्षण देण्याचा हा पहिलाच प्रयत्न असून तो फारच यशस्वी झाला आहे, " अशा अर्थाचें पत्र आलें. रा. रा. खारकर, साठे, फडणीस, चिटणीस वगैरे अनेक मित्रमंडळीकडून हा लेख फार विनोदप्रचुर व माहितीनें परिपूर्ण आहे, असें कळविण्यांत आलें. महाराष्ट्र-साहित्य दुर्दैवानें बंद पडलें. ज्या अंकांत तो आला त्यास मागण्या फार आल्या. पण प्रती उपलब्ध होईनात. तोच पुनरपि छापण्यास अवधि मिळेना. यास्तव इतके दिवस स्वस्थ बसणें प्राप्त झालें.

अलीकडे-पुराण—वस्तु—संशोधनाची गोडी पदवीधरांस व विद्यार्थ्यांस देखील बरीच लागली आहे. प्राचीन अवशेष पाहण्यास सुट्टीच्या दिवसांत अथवा यात्रेच्या प्रसंगीं झुंडीच्या झुंडी जातात. तथापि, त्यांस अल्प किंमतींत त्यांची कल्पना सहज रीतीनें आणून देणारीं चोंपडीं मिळत नाहींत; त्यामुळें त्यांची बरीच निराशा होते. आज काल " हेमाडपंती देवळांचे " इतके प्राचीन पण विपुल अवशेष क्वचितच दृष्टीस पडतात. तरी ते कोणत्या वेळचे असावेत हें कळण्यास मार्ग नसतो. दासनवमीस परळीस मोठी यात्रा भरते. श्रीसमर्थांचे वंशज श्री. बापूसाहेब महाराज आदि करून मंडळी तेथें जाते. प्रसाद होतो. तेव्हां याच वेळीं सज्जनगडावर जमलेल्या सज्जनांस प्रवासवर्णनात्मक रीतीनें हेमाडपंती देवळांची

वगैरे स्थूल माहिती करून देणारा, त्याबरोबरच समर्थांच्या वस्तूंची आठवण करून देणारा आणि लोकांस प्रिय असलेला, पण दुष्प्राप्य झालेला लेख अर्पण करावा अशी प्रबळ इच्छा झाली. तरी गडावर जमलेले सद्‌गृहस्थ उत्सव–प्रसंगीं या पुस्तकास उदार आश्रय देतील व विशेषें करून प्राचीन अवशेष तपासून त्यांचेविषयीं चर्चा करतील आणि परतल्यावर आपल्या इष्ट मित्रांसही त्याची ओळख करून देतील अशी आह्मांस उमेद आहे.

परळी येथील हेमाडपंती देवळांची व त्यांतील नक्षीकामाचीं बरींच छायाचित्रें देण्याचें योजिलें होतें. तथापि त्यांप्रीत्यर्थ येणारा खर्च झेंपेना. तरी टाइम्स ऑफ इंडियाकडून तीन ब्लॉक करवून आणून त्यांवरून सोबतचीं तीन छायाचित्रें छापवून घेतलीं आहेत. त्यांना खर्च मनस्वी आला. पण तीं उत्कृष्ट असावींत हें ध्येय ठेऊन तो सोशिला आहे. श्रीसमर्थ रामदासस्वामींचें छायाचित्र तंजावर येथील अस्सल प्रतीवरून घेतलेलें रा. गणेश विनायक फडके, फोटोग्राफर, कऱ्हाड, यांजकडे उपलब्ध झालें, त्यावरून त्याचा अप्रतिम ब्लॉक करवून आणिला.

या पहिल्या आवृत्तीच्या खपावरून अंदाज बांधून पुढील आवृत्तींत अधिक चित्रें देण्याचा विचार आहे.

प्रस्तुत लेखाचा सर्व प्राथमिक शाळांस व पुस्तकालयांस उपयोग होईल असा आह्मांस भरंवसा वाटतो.

कऱ्हाड

तारीख ११-२-२८ यशवंत राजाराम गुप्ते.

३८९५

# आमची परळीची यात्रा.

लेखकः— य. रा. गुप्ते, बी. ए., एम्. आर. ए. एस्.

माजी असि० सुप० फॉर एपिग्रॅफी.

सातारा जिल्ह्यांत—विशेषेंकरून साताऱ्यास—ज्याचें कांहीं महिने वास्तव्य झालें, त्यानें १२ व्या १४ व्या शतकांत सुप्रसिद्ध असलेली, शिलाहारांचे राज्याच्या एका प्रांतास ललामभूत झालेली, मुसलमानी अमदानींत गर्जना करणारी, शिवछत्रपतींचे वेळीं महत्व कायम राखिलेली व श्रीसमर्थरामदास स्वामींनीं आपल्या वसतीमुळें पुनीत केलेली परळी पुष्कळ दिवस न पाहणें चमत्कारिक तर खरेंच. तथापि कार्यबाहुल्यामुळें आपला उत्साह कैक दिवस दडपून ठेऊन साताऱ्यास दिवस कंठणें आम्हांस भाग पडलें. शेवटीं योगायोग जमून यावयाचा होता व तो आलाही. दोन दिवस सुटी आली. कामाचा लकडा ह्मणण्यासारखा मागें नव्हता. आमचे एका मित्रानें गोष्ट काढिली. सज्जनगडाचे मोहिमेस जावयाचें ना? असें विचारिलें. पुढें पावसाळ्यांतही ती होणें कठीण असें निदर्शनास आणिलें. मग काय ? कशीबशी कामाची व्यवस्था लावून जाण्याचा निश्चय तर कायम केला. तसा निरोपही पाठविला. तास दोन तासानें कामाचे गर्दीत भावी सफरीचें विस्मरण झालें. इतक्यांत चाराचे ठोके पडले. तों आमचे स्नेही दत्त ह्मणून पुढें उभे ! आमच्या काय ? या प्रश्नास त्यांचेकडून काय सामुग्री घ्यावयाची हें प्रत्युत्तर आलें. कसली सामुग्री?

अहो उद्यांच्या मोहिमीची . हो. हो. बरी आठवण झाली. आपली सामुग्री ती काय ? इंडियन इंक, वर्तमानपत्रें ज्यावर छापितात ते कागद, कापूस व कापड. हें तर कांहींच नव्हे ह्मणून आमचे मित्र निघून गेले. आठ वाजण्याचे सुमारास आम्ही घरीं येऊन विचार करूं लागलों: " गेलें तर पाहिजेच ठरल्याप्रमाणें. " ब्रश शोधून काढिला. आमचे मित्रांचे स्नेही आले त्यांस विचारिलें. नवें कापड, कागद व कापूस कोठें आहे ? ते बोलले: " अहो, सर्व दुकानें हिंडलों. पण कापड मिळत नाहीं. " " नाहीं! मग उद्यां जाऊन करणार काय ? लेख मिळाल्यास ठसे घेणार कसे ? गॅझिटीयरमध्यें तर तो अस्पष्ट असल्याचें ह्मटलें आहे. सातान्यासारख्या शहरांत कापड मिळत नाहीं ह्मणतां याचा अर्थ काय ? पुरे झाली बुवा थट्टा. " " नाहीं. खरेंच कापड मिळत नाहीं. आज अमावास्या आहे. " गाडया ठरविल्यांत काय ? होय. अगाऊ पैसेही देऊन टाकिले. तुमचे वांटणीचे दिले. ठीक. पण मग कापडासाठीं सफर फुकट जावयाची ? " कांहीं करा बुवा. कोणी अमावास्या न पाळणारा दुकानदार गांठा. " " पहातों पुन्हां प्रयत्न करून. " याचा परिणाम असा झाला कीं, मोठ्या कष्टानें एक दुकानदार वार दीड वार हारक कापड देण्यास तयार झाला ! पण त्यानें एक अट घातली. कोणची तर कापडाची विक्री अमावास्येच्या दिवशीं करणार नाहीं. यांतून मार्ग काढणें अत्यंत सुलभ झालें. कांकीं फुकट हारक कापड दिलें म्हणजे मिटलें ! ही अट आमचे मित्रांचे स्नेह्यांनीं तेव्हांच कबूल केली ! ! वर्तमानपत्राचे कागद मिळविण्याचें काम सर्वानुमतें मित्रांकडे सोंपविण्यांत आलें होतें. कारण

छापखानेवाल्यास भीड घालण्याची छाती इतरांस नव्हती. कागद विकणारा छापखानेवाला मिळेना. इतरानें भीड घालावी तर बाब क्षुल्लक. कागद सुयोगानें वेळींच आमचेकडे येऊन पडले. कापूस पैदा करण्याची कामगिरी एका गृहस्थानें पत्करिली होती. ती तो पुरी करील याची आह्मांस खात्री होती. तरी रात्रीं नऊ वाजेपर्यंत त्याचा पत्ता लागेना. शेवटीं तो दिसला. पण हातांत कांहीं नाहीं! म्हणूं लागला:– "लोक फार अडवितात.पैशास पैसा भार कापूस देऊं ह्मणतात."आह्मीं सर्व कबूल झालों व पैसे दिले. अर्ध्या तासांत कापूस आला. पण काय? सरकी सगट कापूस! यास काय करावयाचें? असला कापूस असून नसून सारखाच. गृहस्थ ह्मणूं लागला. " आपण रुई पाहिजे कां बोलला नाहींत? कापूस सांगितल्यानें हा गोंधळ उडाला. " आह्मी बोललों: " चुकलों बाबा. पण आतां उपाय काय? " पुन्हां पिंजारी गांठण्याचें त्या गृहस्थानें कबूल केलें. चार आणे देऊन त्यानें आमचा कापूस अर्ध्या तासांत पिंजून दिला. अह्मांस वाटलें आतां मजल गांठली. इतक्यांत इंडियन इंक आणावयास गेलेला मनुष्य हात हालवत परत आला." वाड्याजवळील दुकानाचा मालक पुण्यास गेला आहे बोहऱ्यांचीं दुकानें हिंडून आलों. एका बोहऱ्याचे दुकानीं मिळेल शाई असें ऐकतों. तें बंद झालें." आम्हांस वाटलें इतकेकरून ओमफस् झालें! तथापि उपाय काय? एक इसम काजळ रात्रीं पाडून देण्यास उद्युक्त झाला. तथापि आह्मीं त्याचे विनंतीस मान दिला नाहीं. काजळापासून इतक्या लवकर शाई तयार होण्यासारखी नाहीं, असा आह्मीं निकाल दिला. एवंच शाई मिळाल्यावांचून आमची सभा

बरखास्त झाली. रात्रीं आह्मांस झोंप येईना ! पहाटे दोन तीन वाजे-पर्यंत घरांतलि सर्व पेट्या हुडकून पाहिल्या. पण इंडियन इंकची लहान कांडीही मिळेना. तेव्हां कष्टी होऊन बिछान्यावर अंग टाकिलें. तों झोंप लागली.

दुसरें दिवशीं सकाळीं पांच वाजतां निघावयाचें ठरलें होतें. मुलें कोणी बरोबर घेऊं नयेत असा निर्धार केला होता. तथापि चार वाजतात न वाजतात तों मुलांचा चिवचिवाट सुरू झाला व चहाचीं भांडीं वाजूं लागलीं. त्या नादानें आह्मी जागृत होतों तों आमच्या लिलीनें " काका चहा घ्या " म्हणून कप पुढें आणला. तेव्हां गुळणा करून हा साहेबी थाटाचा चहा आह्मीं घेतला. खालीं येतों तों परळीस कोणी जावयाचें याची भांडाभांडी सुरू होती. जो तो आपाप-पल्यापरीं न्याय मागूं लागला. न्याय देणाराच मिळेना ! सहाचे ठोके पडले. तयारी करूं लागलों. साताचा सुमार झाला. तरी आमचे स्नेही नाहींत ! कीं गाडी नाहीं ! ! हें काय गौडबंगाल ? सर्वच विचित्र भासूं लागलें. तेव्हां आह्मीं निरुद्योगास लागलों. बाहेर गेलो. तों अर्ध्या रस्त्यांत स्नेही भेटले. गाडीही दारापुढें दिसली. विचारण्याचें कारणच राहिलें नाहीं. रात्रीं सभा बरखास्त झाल्यानंतर एका ड्रॉइंग शिक्षकानें आह्मांस कशाबशा पैदा केलेल्या इंडियन इंकच्या दोन कांड्या दाखविल्या.अत्यानंद झाला. गाडींत आह्मी बसूं लागलों. तों मुलें अगोदरच स्वार झालेलीं ! आह्मांस व आमचे मित्रांस आणि त्यांच्या स्नेह्यांस जागा मिळते कोठें ? इतक्यांत कर्मधर्मसंयोगानें एक टांगा मिळाला व आह्मीं सर्वांनीं एकदाची परळीची वाट धरिली.

गजवडी गांवानजीक टांगेवाला व शिग्रामवाला यांची बाचाबाची सुरू झाली. टांगेवाला म्हणे पुलावरून टांगा जातो. मग शिग्रामासच काय झालें ? स्वाऱ्यांस कां छळतोस ! माणूस पाहून काम करावें. या तंट्याचा निकाल नीट लागावा म्हणून आह्मी सर्वच खालीं उतरलों. पुलाजवळ गेलों. तों पाटी पाहिली: कोणचचि गाडी जावयाची नाहीं. तेव्हां मोकळा शिग्राम व टांगा नदींतून सावकाश येऊं द्या असें सांगून आह्मी पूल उतरून गेलों. पुढें पायीं चालण्याची जणूं शर्यतच लागली. सज्जनगडावर जाण्याचा आमचा विचार होता. साताऱ्याहून गड चढण्यास जवळचा व सोईचा रस्ता गजवडी गांवावरून जातो. तथापि आमच्या मित्रांनीं परळी गांवांतील एका देवालयांतील कांहीं अश्लील मूर्ती पाहिल्या होत्या ! त्या आह्मीं एकदां नजरेखालीं घालाव्या व देवळासमोरील कांहीं दगड तपासावेत अशी त्यांची इच्छा होती. सातारा गॅझिटियरमध्यें या देवळांत पुसट लेख असल्याचें आह्मों वाचलें होतें. यामुळें आमचीही जिज्ञासा प्रदीप्त झालेली होती. या सर्व कारणांमुळें समर्थांच्या सज्जनगडाचें दर्शन घेणें पारमार्थिक दृष्ट्या अधिक युक्त असलें तरी भौक्तिकदृष्टीकडेच लक्ष देऊन परळी गांवांत प्रथम जाण्याचा आमचा सर्वांचा निश्चय ठरला ! बोलून चालून संसारांत गुरफटलेले व ऐतिहासिक विषय आणि शिल्पशास्त्र यांस लोलुप झालेलेच आह्मी ! ! असो.

परळी गांवांत फराळाची अथवा जेवणाची सोय करण्यापूर्वी देवालयें व त्या समोरील दगड पाहिल्यावांचून राहवेना. तेव्हां प्रथम त्या बाजूस आह्मीं मोर्चा फिरविला. रस्त्यास लागून असलेले दोन

दगड आमचे मित्रांनीं आह्मांस दाखविले. ते पाहतांच त्या सतींच्या शिला असल्या पाहिजेत अशी खात्री झाली. आमचे मित्रांस आह्मीं झांशी जिल्ह्यांत ललितपुरांत १३ व्या १४ व्या शतकापासून १५ व्या शतकापर्यंत रोंवलेल्या ५०–१०० शिला असल्याचें सांगितलें. खुद्द झांशीस सती होण्याची निराळीच जागा असून तेथें १००।२०० असे दगड आहेत. परळीसही असा कांहीं प्रकार असला पाहिजे; कारण एकाच देवळासमोर आह्मीं ३५।३६ शिला पाहिल्या. या ठिकाणीं पुण्याच्या प्रो० पोतदारांचें आह्मांस स्मरण झालें. कां कीं, त्यांनीं भारत–इतिहास–संशोधक–मंडळासाठीं एक लेख खोदिलेला दगड येथूनच नेला होता व तो लेख लावण्याविषयीं आह्मांस आग्रह केला होता. पुण्यासच तो सतींचा दगड असला पाहिजे असें आह्मीं त्यांस कळविलें होतें. कारण त्यावरील लेखांत पातिव्रत्य वगैरे गुणांचें वर्णन होतें. असला निर्देश एरव्हीं अप्रस्तुत दिसत होता. प्रो. पोतदारांनीं नेलेल्या शिलेवरील लिहिलेला लेख फारच खराब झाला आहे. तथापि सती झालेली स्त्री सामान्य नव्हती. " पृथ्वीपरिपालक " वगैरे शद्बावरून ती राजकुलांतील असावीसें अनुमान होतें. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, तिचें अथवा तिच्या पतीचें नांव लेखांत राहिलें नाहीं! तीं नांवें असलेले भाग तुटून गेलेलें आहेत !!

आमचे मित्रांची जिज्ञासा तृप्त केल्यावर स्वार्थ साधण्याकडे आमची प्रवृत्ति झाली. मूळ गेलों ते लेख शोधून ठसे घेण्यासाठीं. तेव्हां गॅझिटियर बरोबर नेलें होतें, तें वाचून तो लेख शोधून काढण्यास बरोबरच्या सर्वत्रांस आह्मीं विनंति केली. मग काय ? प्रत्येकास वाटू

लागलें लेख आपण शोधणार! मात्र पत्ता लागेना. देवालयांतील दगडा-वरील नक्षी यास लेख समजून कांहींनीं आमची इकडून तिकडे, तिकडून इकडे जाण्याची तारांबळ उडवून दिली.

लेख शोधून काढण्याचा आम्हीं निश्चयच केला होता. त्या-वांचून पाणीच प्यावयाचें नाहीं असें ठरविलें. परळी गांवांतील साव--कार व गुरव आले. त्यांसही विचारिलें. पण पत्ता लागेना. लेखाचा दगड होता तो पुण्यास सरकारांत नेला असें म्हणूं लागले. खात्री झाली कीं, ही प्रो० पोतदारांनीं नेलेली सतीची शिलाच होय. हिच्याशीं कांहीं कर्तव्य नव्हतें. आम्ही हुडकीत होतों तो देवळांतील लेख. " लेखच नाहीं. आम्ही लहानाचे मोठे येथें झालों. कधीं लेख पाहिला नाहीं. असणार कोठून? " असला वितंडवाद लोक घालूं लागले. तथापि आमची खात्री व्हावी कशी? गॅझिटियर चुकेंत थोडेंच? शेवटीं आमचे प्रयत्नांस यश आलें. " निश्चयाचें बळ तुका ह्मणे तेंचि फळ ". लेख सांपडला. त्या भोंवतीं झुंड पडली. दिसतें काय ? लेख अगदींच पुसट ! कोणी म्हणे लेख खराच. कोणी ह्मणे उगीच हत्यारानें शेतकऱ्यानें वगैरे खरवडलेलें आहे. आमची खात्री झाली. डोंगर पोखरून उंदीर काढिल्याप्रमाणें झालें ! ! त्या दिवशीं सकाळ-पासून वाटत होतें कीं, आम्ही आज मोठा शोध लावणार. त्यावर मराठींत व इंग्रजींत निरनिराळ्या संस्थांच्या त्रैमासिकांतून कांहीं लिहि-णार. इंग्लंडांत परळीच्या लेखांचें महत्व गाणार ! पण ओम् फस्. ! !

इतकें झालें तरी लेख वाचण्याची आमची हांव पुरी झाली नाहीं. तेव्हां गुरवास बोलावून एक मोठा हांडाभर पाणी तत्काळ

आणविलें. गत्रत आणवून ज्या खांबावर लेख ओबडधोबड खरवडला होता त्याचा एक तृतियांश भाग धुवविला. तरी कांहीं वाचतां येईना. नंतर ठसे घेतल्यावांचून गत्यंतर नाहीं, असें जाणून आमचीं शस्त्रास्त्रें सज्ज करण्यास हुकूम केला. कापूस बाहेर काढविला. ठसे घेण्याचे दोन बोळे तयार केले. इंडियन इंकची एक कांडीं काढून बशींत उगाळावयास देवविली. ती उगाळेनाच ! जणू लांकूडच भासूं लागलें. आम्हीं प्रयत्न केला. होता तेवढा जोर देऊन चार वेढे उगाळिले. तों किंचित् हिरवट रंगाचें पाणी दिसलें ! आमचे मित्रांस आम्हीं म्हटलें: " हे हिरवे ठसेच तयार व्हावयाचे कीं काय? " त्यांनीं उत्तर केलें, " काळे पुढील खेपेस बनवूं ! तूर्त ठसे घ्यावयाचे कसे हें तर आह्मांस शिकवा. काय लिहिलें आहे तें निश्चित करा. " तथापि ही पुनरपि परळीस येण्याची क्लृप्ति आम्हांस पसंत न पडून आम्हीं दुसरी इंडियन इंकची कांडी स्वतःच उचलली. बशींत जल घालून उगाळावयास लागलों. रंग तर काळा आला. पण कांडी घड उगाळेना. डोकें घातल्याशिवाय हें कोडें उलगडत नाहींसें समजून गुरवाकडून सहाण आणविली व आमचे मित्रांचे उत्साही मुलास तींवर पाणी घालून कांडी उगाळावयास लावविली. प्रयत्नास यश आलें. कामापुरती शाई कष्टानें कां होईना तयार झाली. दगड ब्रशनें साफ करून त्यावर सफाईनें कागद ठेवून तो नीट ब्रशनें बसवून, बोळ्यानें शाई लावून ठसा तर काढिला. "केदार" हा पुसट शब्द वाचला. पुढें ' नाथ ' अथवा ' ईश्वर ' असणें सहाजिक. म्हणजे ' केदारनाथ ' किंवा ' केदारेश्वर ' असलें पाहिजे असें

आह्मीं गृहीत धरिलें. गुरवास व इतर गांवकऱ्यांस त्या शिवालयाचें नांव विचारिलें. " केदारेश्वर " असें उत्तर आलें. संशयनिवृत्ति झाली. आमचा अजब शोध काय तो देवळाचें नांव ठरविण्यापुरताच झाला! उपाय काय ?

नंतर शिल्पकलेकडे वळलों. खालीं वर पाहिलें. मंडपाकडे व द्वाराकडे नजर फेंकिली. "देऊळ तर हेमाडपंती असून उत्तरकालीन आहे," असें आह्मीं उद्गारलों. मंडळी बोलूं लागली: " काय ह्मणतां तर रामदेवरावाच्या हेमाद्रीच्या वेळचें हें देवालय आहे? आह्मांस कांहीं स्पष्ट करून सांगाल तर उपकार होतील बुवा. " आह्मीं ह्मटलें: " हेमाद्रीच्या वेळचें हें शिवालय नाहीं. हेमाडपंती याचा अर्थ त्याचेच वेळची इमारत असा घ्यावयाचा नसतो व नाहीं. ही एक शिल्पशास्त्राची ठेवण आहे. ही हेमाद्रीच्या वेळीं प्रचारांत होती. हिंतील विशेष हा कीं, कोठें चुना लावावयाचा नाहीं. चुन्यावांचून इमारत नीट ताठ राहिली पाहिजे. वर्षानुवर्षें कोसळतां कामा नये. एकमेकांवर दगड असे रचिले पाहिजेत कीं, एकमेकांचा भार एकमेकांस सहन होऊन इमारतीस जोर राहिला पाहिजे. ती खचतां कामा नये. ही ठेवण हेमाडपंताचे पूर्वींही कांहीं काल पहावयास मिळते. पुढें तर पुष्कळच ठिकाणीं हिचा प्रसार झाला. " ठीक. " पण, उत्तरकालीन देऊळ कां ठरविलेंत बुवा ?" सांगतों: " यास मुख्य प्रमाण एक आहे. प्रथम प्रथमच्या हेमाडपंती देवळांत माणसाच्या आकाराच्या मूर्तींचें प्राबल्य असतें. देवळांत आजुबाजूस अशा मूर्ती फार. नक्षीकाम, विशेषेंकरून काटकोण, त्रिकोण, वर्तुळें असावयाचीं. पण कमी प्रमाणांत. फार तर तितक्याच प्रमाणांत.

उत्तरकालीन देवालयांतून मूर्ती कमी व काटकोण, त्रिकोण वगैरे पुष्कळ अधिक." "आतां नीट लक्षांत आलें, आह्मीं देऊळ पाहिलें होतें, पण या गोष्टी नव्हत्या ठाऊक. एकूण इमारतीच्या बांधणीवरून त्याचा काल ठरवितां येतो तर." "जवळ जवळ निश्चित करितां येतो. थोडी चूक राहूं शकते." "ऐका. आणखी एक गोष्ट या देवालयांतून निदर्शनास येते. शिल्पकार तीन माणसांचे मिळून चार पाय व चार हात, दोन मोरांचे मिळून दोनच पाय खोदून प्रत्येक इसमास त्याच वेळीं दोन हात व दोन पाय आणि प्रत्येक मयूरास नित्याप्रमाणें दोन पाय दिसतील अशी खुबी करितो." वाचकवर्ग या परळीचे हेमाडपंती शिवालयांतील कांहीं नक्षी व आकृत्या पाहण्यास उत्सुक झाला असेल असें समजून त्यांचीं छाया-चित्रें सोबत जोडीत आहेंत.

वरील आकृत्या वगैरे उतरून झाल्यावर आह्मीं परळीच्या राममंदि-रांत भोजनास गेलों. बसतों न बसतों तोंच एक गमतीचा प्रकार दिसून आला. मंडप तर अगदीं नवीन पत्रे घातलेला. मूर्ती थोड्या अगोदरच्या. तथापि जुन्या नव्हेत. गाभारा तर हेमाडपंती, वरील शिवा-लयाचे जवळील देवळाचे धर्तीचा.

गांवांतील एक सद्गृहस्थ रा. देशपांडे आमचे आदरातिथ्यास राम-मंदिरांत आले होते. त्यांस आह्मीं विचारिलें कीं: "या ठिकाणीं हा असा चमत्कारिक प्रकार कां दिसतो?" ते ह्मणूं लागले: "आपण बोललांत त्याच देवालयाचा हा भाग येथें उभा केला आहे. तेथील दगड गांवांतील लोक उचलून नेऊन घरास लावूं लागले. दिसतो तो

भाग पांच चार वर्षांत नाहींसा होण्याचा रंग दिसूं लागला. तेव्हां गांववाल्यांनीं दगडांवरून नंबर घालून पडित झालेला भाग जशाचा तसाच गांवचे मध्यभागीं उभा केला!" वाटूं लागलें कीं, ही एक पुराणवस्तुसंरक्षणाची अजब तोड गांववाल्यांनी काढली ! ! पुराणवस्तुसंशोधनखात्याचें अर्धें काम त्यांनीं आपल्या खर्चानेंच केलें!!! रामचंद्रास साष्टांग नमस्कार करून आह्मीं सर्व भोजनास बसलों. भोजन झाल्यावर पुढें काय करावयाचें याची वाटाघाट सुरू झाली. रा. देशपांडे बोलले: "आतां एक वाजून गेला. आतां जरा आराम करून चार पांच वाजण्याचे सुमारास स्वार होऊन साताराची वाट धरा. उन्हाळ्याचे दिवस. मुलांबाळांस उन्हांत हिंडवूं नका." ही सूचना आह्मांस कसली पसंत पडते! ऐषआराम करण्यास आह्मी थोडेच परळीस गेलों होतों? प्रश्न पडला एवढाच. आमचे मित्र व रा. देशपांडे यांचीं मनें दुखविल्याशिवाय आपला हेतु साधावयाचा कसा! तोड काढली. प्रजासत्ताक राज्य समजून मतें घ्यावयाचीं. आमची मुख्य मदार मित्रांचे स्नेहावर. त्यांस विचारिलें: " सज्जनगडावरील पादुकांचें दर्शन घेतल्यावांचून साताराचा रस्ता सुधारावयाचा काय?" आपली तर बुवा हिंमत नाहीं. रात्रीं ताप आला होता, आतांही आहे." हें उत्तर ऐकून पाण्यांत टाकलेल्या मातीच्या ढिकळ्याप्रमाणें आमची स्थिति झाली. प्रथमग्रासे मक्षिकापात झाला. दुसरी तोड काढिली. आमचे मित्रांचा मुलगा चलाख दिसत होता. स्काउट लोकांच्या प्रमाणें पाण्याची बाटली त्यानें काखोटीस मारिली होती. तेव्हां त्याच्या आविर्भावावरून तो उन्हास न जुमानितां समर्थांचे सज्जनगडावर येण्यास कांकूं करणार नाहींसें दिसलें. " कांहो,

आह्मी उन्हांत किल्यावर जाणार. तुमची तयारी आहे काय ? ” “ मी तर ऊन तहान कांहीं जाणत नाहीं. आपण उठलांत कीं मी चालूं लागलों. ” या निश्चयानें आह्मांस तर स्फुरण चढलें. आमची तयारी पाहून आमच्या दोन मुलींनीं कंबर बांधिली. छत्र्या आणिल्या होत्या.पण मुली जोडे विसरून आल्या होत्या.आह्मीं ह्मटलें:-“कोणाचे पाय भाजत असले तर तिनें राममंदिरांत बसावें. रामदासस्वामींच्या पादुकांचें दर्शन घ्यावयाचें असलें तर आह्मी.कोणाच्या आड येत नाहीं.” ही पडल्या फळाची आज्ञा घेऊन मुली तर उठल्या. इतक्यांत आमचे मित्रांनीं व रा. देशपांडे यांनीं अखेरचा प्रयत्न करून पाहिला.“ अहो, आपली प्रकृति नीट नाहीं. ऊन लागून ताप सडकून येईल. मुलींचे पायांत आज जोडे नाहींत. त्याही तापानें रात्रीं फणफणतील. पादुकांचें दर्शनास पुन्हां येऊं. ” आह्मांस हा युक्तिवाद पटला नाहींसें पाहून ते पुढें ह्मणाले: “ निदान चार वाजण्याचे आंत उठूं नका. चार वाजतां निघालांत तरी साडेपांचचे सुमारास दर्शन घेऊन गजवडी गांवाजवळ किल्ला उतरून याल. शिग्राम टांगा तिकडेच बोलावूं.” “ ठीक आहे. तसें करा. आम्ही गजवडी गांवाजवळ उतरून येऊं. पण किल्ला मात्र आतांच चढूं लागणार. वर एक तास जास्त मिळेल तर पुष्कळ उपयोग होईल. कांहीं माहिती मिळवूं. देखावा पाहूं. सावकाश चढूं. ” हा आमचा निर्धार पाहून आमचे मित्र ह्मणाले:- “ आपण तीन वाजतां निघालांत तरी आम्ही चार वाजतां निघून आपणांस सहज गाठूं.” “ ठीक आहे ”

आम्हीं चालूं लागलों. मुली निघाल्या. एक फर्लांग जातों न जातों

तर आमच्या लिलीच्या पायाचे तर फुटाणे भाजल्यासारखे झालेसें वाटलें. पण ती वस्ताद. दाद लागूं देईना. आम्हीं पुढें जाऊन दिसेनासें होतों तों आमची नजर चुकवून तिनें तर पोबारा केला! तथापि युक्ति अजब!! थोरल्या बहिणीची समजूत घातली कीं,' किल्यावर येण्यासाठीं धाकटा भाऊ गोपिनाथ राममंदिरांत रडत होता, तो उठला असेल. त्यास घेऊन येतें.' हें तिला पटलें. ती सावकाश चालूं लागली. आम्हीं पाहिलें तों ती फार मागें व एकटी. आम्हीं थांबलों. ती जवळ आल्यावर तिला सर्व विचारिलें. तिनें सांगितलें तेव्हां आमची खात्री झाली कीं, उन्हाच्या तापामुळें लिलाबाईनें सूं बाल्या केला! मग उरलेले आम्हीं निघे रस्ता कंठूं लागलों. आमचे मित्रांचे मुलाची तडफ मोठी. आमचा टिकाव लागेना. आम्हीं विचारिलें: " कांहो? या डोंगरावर झाडें कां नाहींत? " आहेत, दुसऱ्या रस्त्यानें गजवडीचे बाजूनें ⅓ डोंगर चढून गेलों म्हणजे त्या बाजूनें दोन झाडें आहेत. एकास मोठा ढोल आहे, तिच्यांत कधीं कधीं वाघही छपून बसतो. निराशा झाल्यावर झाडाचे ऐवजीं छत्रीचाच आश्रय करून कांहीं वेळ आम्हीं तर बसलों. ५।१० मिनिटांनीं उठलों. रगाडा मारिला. झाडापर्यंत तों मजल मारिली. तेथें विश्रामहेतुस्तव पाठ टेंकिली. म्हटलें: " काढा बुवा पाणी, पाहूं कितपत गार आहे तें. परळी गांवांत मोठ्या कष्टानेंच आम्हीं बाटलीभर पाणी मिळविलें होतें तेंच हें."चार घोट पाणी प्यालों. मुलीनें मागितलें. तिलाही दिलें. चारच घोट राहिले. तेव्हां जरुरीच्या प्रसंगासाठीं तें राखून ठेवणें भाग पडलें. चालूं लागलों. आणखी एकतृतियांश मार्ग कंठला. पुढें लहानसें देवालय लागलें. आतां समर्थांचे

ध्यानानें किल्ल्याचे पायथ्याशीं येण्यास समर्थ झालों ह्मणून अत्यानंद झाला. बुरूज दिसला. तेव्हां बाटलींतील पाणी काढण्यास मित्रांचे मुलास विनंति केली. " तें राखून ठेवण्याची आतां अवश्यकता नाहीं. सज्जनगडावर तलाव आहे, त्यांत मुबलक व स्वच्छ पाणी आहे. " हें ऐकून एका अगदीं लहान देवळाचे चबूतऱ्यावर आह्मीं अंग टेंकिलें. तों " हीं दोन देवालयें राममंदिरांत भेटलेल्या रा. देशपांड्यांनीं बांधिलीं, "असें मित्रतनयानें सांगितलें. हीं पाहून आह्मांस श्रीक्षेत्र काशी येथें टोलेजंग शिवालयें बांधण्याची ज्यांस ऐपत नाहीं त्यांनीं दगडाच्या लहान लहान शिवालयप्रतिमा दशाश्वमेध व मणिकार्णिका घाट यांचे दरम्यान करून ठेविल्या आहेत त्यांचें स्मरण झालें. उठून दरवाजाजवळ गेलों तों जींवर अरेबिकमध्यें लेख खोदला आहे ती शिला दिसली. हिचे ठसे प्रो. सरकार यांस हवेतसे कळले. तथापि वरून फळी सोडून उभें राहण्याची सोय केल्यावांचून ते घेणें शक्य नव्हतें. शिवाय आमची नामी इंडियन इंक ! ती काय कामाची ? पायऱ्या चढून किल्ल्यावर गेलों. उजव्या हातास झालों. तों देवीचें देवालय दिसलें. दर्शन घेतलें. देवीचे समोर उजव्या हातास ओटा आहे. ' तेथें रामदासस्वामी बसत असत. शिष्यवृंद तेथेंच जमे. श्री शिवछत्रपतीही तेथें श्रींचें दर्शन घेत,' असें कळलें. त्या ओटयाला हात लावून वंदन केलें. देवीचे देवालयांतून निघाल्यावर तलावाजवळ आलों, तों एक सतीची शिला पाहिली. आणखी शोधूं लागलों. तथापि अधिक तसले दगड दिसेनात. तलावांत स्वच्छ भरपूर पाणी पाहतांच आह्मीं तिघे अंगोदर खालीं धांवत गेलों. तों एक मुलगा दटावूं लागला:

" अहो, तलावाच्या पायऱ्यावर जोडे अणावयाचे नाहींत. " नंतर आ-
म्हीं दोघांनीं जोडे वर काढून ठेविले. मुलींचे पायांत तर जोडे नव्हतेच.
तलावांत एक लिंग होतें. त्या शेजारींच एक भोंक दिसलें. डोकावून पाहतों
तों खालीं मोठें भगदाड दिसलें. हा काय प्रकार? येथें आमच्या पुराण-
वस्तुसंशोधनास वाव मिळतो कीं काय याचा विचार करूं लागलों.
पण आम्हांस फावलें कोठें? पादुकांचें दर्शन घेऊन शिघ्रांम टांगेवाल्या-
ची खोटी करावयाची नव्हती. तरी एवढी खात्री झाली कीं, तलाव
जुनीं लेणीं तोडून पुरा केला अथवा जुने हौद तोडून मोठा के-
ला. बाकीची चौकशी करण्यास, मोजमाप घेण्यास, पाण्यांत उतर-
ण्यास, अवकाश नव्हता. गॅझिटियरमध्यें तर याबद्दल चकार शब्द
नाहीं! त्यांत माहिती देणारा सज्जनगडावर गेला तेव्हां बहुधा तलाव भरला
असल्यामुळें वरील गोष्ट त्याच्या नजरेस आली नाहीं. असो. तला-
वाचे बाहेर येतांच आम्हीं राममंदिराची वाट धरिली. आवारांत जातों
तों आमचे मित्रानें खालून येऊन आम्हांस गांठलें. उत्तम झालें. कारण गडावर
आमची कोणाची ओळख नव्हती. मित्रांस जाणणारी मंडळी होती.
रामदासस्वामी पूजीत होते त्याच मूर्ती मंदिरांत आहेत. आम्हीं सर्वांनीं
साष्टांग नमस्कार केले. फुलना फुलाच्या पाकळ्या पुढें ठेविल्या. तीर्थ-
प्रसाद घेतले. पुजाऱ्यांस वाटलें आम्हीं दुरून आलों. तेव्हां त्यांनीं
मूर्तीच्या खालच्या गाभाऱ्यांत समर्थांची समाधि आहे, तेथें नेलें. मिण
मिणणारा दिवा होता तो मोठा करून दर्शन करविलें. ' आज
श्रमाचें सार्थक झालें ' ह्मणून आम्हीं बाहेर पडलों. आमचे मि
ललेः " श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या कांहीं चिजा शेजारच्या

ध्यानानें किल्ल्याचे पायथ्याशीं येण्यास समर्थ झालों ह्मणून अत्यानंद झाला. बुरूज दिसला. तेव्हां बाटलींतील पाणी काढण्यास मित्रांचे मुलास विनंति केली. " तें राखून ठेवण्याची आतां अवश्यकता नाहीं. सज्जनगडावर तलाव आहे, त्यांत मुबलक व स्वच्छ पाणी आहे. " हें ऐकून एका अगदीं लहान देवळाचे चबूतऱ्यावर आह्मीं अंग टेंकिलें. तों " हीं दोन देवालयें राममंदिरांत भेटलेल्या रा. देशपांड्यांनीं बांधिलीं, "असें मित्रतनयानें सांगितलें. हीं पाहून आह्मांस श्रीक्षेत्र काशी येथें टोलेजंग शिवालयें बांधण्याची ज्यांस ऐपत नाहीं त्यांनीं दगडाच्या लहान लहान शिवालयप्रतिमा दशाश्वमेध व मणिकार्णिका घाट यांचे दरम्यान करून ठेविल्या आहेत त्यांचें स्मरण झालें. उठून दरवाजाजवळ गेलों तों जींवर अरेबिकमध्यें लेख खोदला आहे ती शिला दिसली. हिचे ठसे प्रो. सरकार यांस हवेतसे कळलें. तथापि वरून फळी सोडून उभें राहण्याची सोय केल्यावांचून ते घेणें शक्य नव्हतें. शिवाय आमची नामी इंडियन इंक ! ती काय कामाची ? पायऱ्या चढून किल्ल्यावर गेलों. उजव्या हातास झालों. तों देवीचें देवालय दिसलें. दर्शन घेतलें. देवीचे समोर उजव्या हातास ओटा आहे. ' तेथें रामदासस्वामी बसत असत. शिष्यवृंद तेथेंच जमे. श्री शिवछत्रपतीही तेथें श्रींचें दर्शन घेत,' असें कळलें. त्या ओटयाला हात लावून वंदन केलें. देवीचे देवालयांतून निघाल्यावर तलावाजवळ आलों, तों एक सतीची शिला पाहिली. आणखी शोधूं लागलों. तथापि अधिक तसले दगड दिसेनात. तलावांत स्वच्छ भरपूर पाणी पाहतांच आह्मीं तिघे अंगोदर खालीं धांवत गेलों. तों एक मुलगा दटावूं लागला:

" अहो, तलावाच्या पायऱ्यावर जोडे अणावयाचें नाहींत. " नंतर आह्मीं दोघांनीं जोडे वर काढून ठेविले. मुलींचे पायांत तर जोडे नव्हतेच. तलावांत एक लिंग होतें. त्या शेजारींच एक भोंक दिसलें. डोकावून पाहतों तों खालीं मोठें भगदाड दिसलें. हा काय प्रकार? येथें आमच्या पुराणवस्तुसंशोधनास वाव मिळतो कीं काय याचा विचार करूं लागलों. पण आम्हांस फावलें कोठें? पादुकांचें दर्शन घेऊन शिघ्रांम टांगेवाल्याची खोटी करावयाची नव्हती. तरी एवढी खात्री झाली कीं, तलाव जुनीं लेणीं तोडून पुरा केला अथवा जुने हौद तोडून मोठा केला. बाकीची चौकशी करण्यास, मोजमाप घेण्यास, पाण्यांत उतरण्यास, अवकाश नव्हता. गॅझिटियरमध्यें तर याबद्दल चकार शद्ब नाहीं!त्यांत माहिती देणारा सज्जनगडावर गेला तेव्हां बहुधा तलाव भरला असल्यामुळें वरील गोष्ट त्याच्या नजरेस आली नाहीं. असो. तलावाचे बाहेर येतांच आह्मीं राममंदिराची वाट धरिली. आवारांत जातों तों आमचे मित्रानें खालून येऊन आह्मांस गांठलें.उत्तम झालें.कारण गडावर आमची कोणाची ओळख नव्हती. मित्रांस जाणणारी मंडळी होती. रामदासस्वामी पूजीत होते त्याच मूर्ती मंदिरांत आहेत. आह्मीं सर्वांनीं साष्टांग नमस्कार केले. फूलना फुलाच्या पाकळ्या पुढें ठेविल्या. तीर्थप्रसाद घेतले. पुजाऱ्यांस वाटलें आह्मीं दुरून आलों. तेव्हां त्यांनीं मूर्तीच्या खालच्या गाभाऱ्यांत समर्थांची समाधि आहे, तेथें नेलें. मिणमिणणारा दिवा होता तो मोठा करून दर्शन करविलें. ' आजच्या श्रमाचें सार्थक झालें ' ह्मणून आह्मीं बाहेर पडलों. आमचे मित्र बोलले: " श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या कांहीं चिजा शेजारच्या इमारतींत

आहेत, पण त्यांचें दर्शन यावेळीं होणें कठीण. सकाळीं त्या दाखवितात. आह्मीं थोडे श्रमी झालों. इतक्यांत एक सारस्वत ब्राह्मण होते, त्यांनीं पुजाऱ्यांस बोलावून, सोंवळें नेसून, स्वामी बसत होते त्या खोलींत त्यांस जाण्यास सांगितलें. ते गेले. दिवा मोठा केला. पलंग दाखविला तो आंखुड दिसला. "इतक्या लहान पलंगावर स्वामी कसे निजत होते ?" रा. वासुदेवराव मंत्री सज्जनगडावर सेवेस असतात. त्यांनीं सांगितलें कीं, फक्त चांदीचे पाय स्वामींचे वेळचे आहेत. दांड्या मोडक्या असल्यामुळें लहान करविणें भाग पडलें. रामदासस्वामींचे बसण्याचे खोलींत, त्यांची पितळी, काठी, त्यांचा तांब्या व त्यांचा हांडा वगैरे जिनसा आहेत. तांब्या कांठास किंचित फुटला आहे. काठी वेताची आहे. हांडा मोठा आहे. आह्मांस तर तो मोकळाच उचलण्याची पंचाईत पडली ! कल्याणस्वामी परळी गांवापलीकडील उरमोडी नदीवरून प्रत्यहीं तो श्रीरामदासस्वामींसाठीं सहज भरून आणीत असें सांगतात ! काय ही शक्ति !! केवढा हा ब्रह्मचर्याचा महिमा !!! समर्थांची कुबडी आहे. तींत गुप्ति आहे. ती शिवछत्रपतींनीं समर्थांस दिली ह्मणतात. वंदन केलें. हातांत घेऊन कुबडी धरावयाची तशी धरून पाहिली. आमची उंची कांहीं कमी नाहीं. ५ फूट ×९ इंच आहे. तरी कुबडी आह्मांस बरीच उंच पडूं लागली. तीवरूनच परीक्षा करावयाची तर स्वामी ६ फुटांहून उंच असले पाहिजेत. तसबीरींत लहान दाखवितात हें काय ? राममंत्र्यास विचारिलें: "कायहो समर्थांचे वेळची एकादी तसबीर आहे काय ?" होय ह्मणून पुजाऱ्यांपासून त्यांनीं एक हातानें काढिलेली तसबीर आणविली.

'समर्थांचे वेळची ती' असें सांगितलें. तिचेखालीं अगदीं अलीकडे चांदीचे लहान पत्र्यावर तीन ओळींत अक्षरें खोदविलीं आहेत. तीं अशीं:—

श्रीचरणींतत्पर
सखाराम अमृत
मुसारी शके १८०९

श्री रामदासस्वामींचें एक वल्कल आहे तें सुमारें ४×३ हात आहे. तें सोंवळ्यांत असल्यामुळें नक्की माप घेतां येईना. समर्थांचा जरीचा फेटा आहे. तो सु. २॥×२॥ हात असून मध्यें मध्यें फाटलेला आहे.

नंतर धुळ्याचे वकील रा. देव. एम्. एल्. सी. यांनीं गडावर याच आवारांत लहानसें पुस्तकालय ठेविलें आहे, तें पहावयास आम्हांस नेलें. पुस्तकांची अनुक्रमणिका पाहिली. श्रीसमर्थ संप्रदायाचीं कागदपत्रें रामदास आणि रामदासी भाग नववा, सर पाहिला, मणि नववा यांत छापिलीं आहेत. त्यांत लेखांक १ पृष्ठ १४ वर स्वामींचें अस्सलपत्र देऊन त्यांतील कांहीं भागाचें छायाचित्र दिलें आहे. सर्वत्र पत्राची प्रतिकृति रा. मंत्री यांचे संग्रहीं होती; ती त्यांनीं पुढें ठेविली. तेव्हां ती समग्र वाचून होईपर्यंत टांगेवाल्याची वगैरे पर्वा न करितां हलणार नाहीं असें आह्मी सांगितलें. या करड्या जबाबास उत्तर कोण देणार ? पत्र वाचून झाल्यावर घाईघाईनें कांहीं टिपणें करून घेऊन आह्मीं सर्व मुख्य इमारतीचे आवारांत बाहेर पडलों. डाव्या हाताचे बाजूस कांहीं बांधकाम चाललें होतें. त्या इमारतींत आमचे मित्र आह्मांस घेऊन गेले. आंत गेलों तों समोरच अगदींच साधी समाधि दिसली. गडावरील मंडळी बरोबर होती. त्यांनीं सांगितलें कीं, समर्थशिष्या अक्काबाई हिची ही समाधि होय.

आहेत, पण त्यांचें दर्शन यावेळीं होणें कठीण. सकाळीं त्या दाखवितात. आह्मी थोडे श्रमी झालों. इतक्यांत एक सारस्वत ब्राह्मण होते, त्यांनीं पुजाऱ्यांस बोलावून, सोंवळें नेसून, स्वामी बसत होते त्या खोलींत त्यांस जाण्यास सांगितलें. ते गेले. दिवा मोठा केला. पलंग दाखविला तो आंखुड दिसला. "इतक्या लहान पलंगावर स्वामी कसे निजत होते ?" रा. वासुदेवराव मंत्री सज्जनगडावर सेवेस असतात. त्यांनीं सांगितलें कीं, फक्त चांदीचे पाय स्वामींचे वेळेच आहेत. दांड्या मोडक्या असल्यामुळें लहान करविणें भाग पडलें. रामदासस्वामींचे बसण्याचे खोलींत, त्यांची पितळी, काठी, त्यांचा तांब्या व त्यांचा हांडा वगैरे जिनसा आहेत. तांब्या कांठास किंचित फुटला आहे. काठी वेताची आहे. हांडा मोठा आहे. आह्मांस तर तो मोकळाच उचलण्याची पंचाईत पडली ! कल्याणस्वामी परळी गांवापलीकडील उरमोडी नदीवरून प्रत्यहीं तो श्रीरामदासस्वामींसाठीं सहज भरून आणीत असें सांगतात ! काय ही शक्ति ! ! केवढा हा ब्रह्मचर्याचा महिमा ! ! ! समर्थांची कुबडी आहे. तींत गुप्ति आहे. ती शिवछत्रपतींनीं समर्थांस दिली ह्मणतात. वंदन केलें. हातांत घेऊन कुबडी धरावयाची तशी धरून पाहिली. आमची उंची कांहीं कमी नाहीं. ५ फूट ×९ इंच आहे. तरी कुबडी आह्मांस बरीच उंच पडूं लागली. तिवरूनच परीक्षा करावयाची तर स्वामी ६ फुटांहून उंच असले पाहिजेत. तसबीरींत लहान दाखवितात हें काय ? राममंत्र्यास विचारिलें: "कायहो समर्थांचे वेळची एकादी तसबीर आहे काय ?" होय ह्मणून पुजाऱ्यांपासून त्यांनीं एक हातानें काढिलेली तसबीर आणविली.

'समर्थांचे वेळची ती' असें सांगितलें. तिचेखालीं अगदीं अलीकडे चांदीचे लहान पत्र्यावर तीन ओळींत अक्षरें खोदविलीं आहेत. तीं अशीं:—

श्रीचरणींतत्पर
सखाराम अमृत
भुसारी शके १८०९

श्री रामदासस्वामींचें एक वल्कल आहे तें सुमारें ४×३ हात आहे. तें सोंवळ्यांत असल्यामुळें नक्की माप घेतां येईना. समर्थांचा जरीचा फेंटा आहे. तो सु. २॥×२॥ हात असून मध्यें मध्यें फाटलेला आहे.

नंतर धुळ्याचे वकील रा. देव. एम्. एल्. सी. यांनीं गडावर याच आवारांत लहानसें पुस्तकालय ठेविलें आहे, तें पहावयास आम्हांस नेलें. पुस्तकांची अनुक्रमणिका पाहिली. श्रीसमर्थ संप्रदायाचीं कागदपत्रें रामदास आणि रामदासी भाग नववा, सर पाहिला, मणि नववा यांत छापिलीं आहेत. त्यांत लेखांक १ पृष्ठ १४ वर स्वामींचें अस्सलपत्र देऊन त्यांतील कांहीं भागाचें छायाचित्र दिलें आहे. सर्वत्र पत्राची प्रतिकृति रा. मंत्री यांचे संग्रहीं होती, ती त्यांनीं पुढें ठेविली. तेव्हां ती समग्र वाचून होईपर्यंत टांगेवाल्याची वगैरे पर्वा न करितां हलणार नाहीं असें आह्मीं सांगितलें. या करड्या जबाबास उत्तर कोण देणार ? पत्र वाचून झाल्यावर घाईघाईनें कांहीं टिपणें करून घेऊन आह्मीं सर्व मुख्य इमारतींचे आवारांत बाहेर पडलों. डाव्या हाताचे बाजूस कांहीं बांधकाम चाललें होतें. त्या इमारतींत आमचे मित्र आह्मांस घेऊन गेले. आंत गेलों तों समोरच अगदींच साधी समाधि दिसली. गडावरील मंडळी बरोबर होती. त्यांनीं सांगितलें कीं, समर्थांची शिष्या अक्काबाई हिची ही समाधि होय.

हीं पाहून झाल्यावर मित्रांनीं सांगितलें: " समर्थांच्या वंशज वहिनीसाहेब शेजारचेच घरांत असतात. त्या साध्वीचें दर्शन व त्यांचा प्रसाद घेऊन निघावयाचें." नाहीं कोण ह्मणणार ? आह्मी सर्व जातांच आमचें आदरातिथ्य होऊन आम्हांस प्रसाद मिळाला. तो घेतल्यावर आह्मीं दोन प्रश्न वहिनीसाहेबांस विचारिलें: " सज्जनगडावरचें राममंदिर श्री रामदासस्वामींनीं बांधिलें काय ? त्यांतील मूर्ती त्यांचे हातच्या आहेत काय? " बाईनीं खात्री केली कीं, मंदीर नंतरचें आहे. मूर्ती समर्थांस दिल्या होत्या. त्या ते त्यांच्या बसावयाचे खोलींत पूजित असत. स्वामींचे स्वर्गवासानंतर त्या राममंदिरांत आणिल्या. आह्मी विचारिलें:" रामचंद्राचे पायाखालींच त्यांची समाधि कशी आली? ती जागा पूर्वींच ठरवून ठेविली होती काय ?" वहिनीसाहेब बोलल्या: " कल्याणस्वामींनीं एकदां समर्थांस विचारिलें होतें कीं,खड्डा (समाधि आहे तो ) बुजवावयाचा काय ? " " हाही कामास येईल " असें उत्तर मिळालें. यावरून पुढें येथेंच समर्थांची राहण्याची- समाधि घेण्याची-इच्छा होती हें गृहीत धरून तेथें समाधि बांधण्यांत आली. वहिनीसाहेबांचा आशीर्वाद घेऊन आम्हीं तडक निघालों, ते गजवडीगांवापासून कांहीं अंतरावर शिग्राम व टांगा आणि इतर मंडळी वाट पहात होती तेथें आलों. स्वार झालों ते सायंकाळीं साताऱ्यास येऊन पोहोंचलों.

वाचकहो, येथपर्यंत ही आमच्या सहलाची हकीगत दिली ती आमचे मित्रांस, त्यांच्या स्नेह्यांस आणि इतर मंडळीस आवडली. त्यांस वाटलें ही वाचकवर्गास रुचेल. सबब सादर केली आहे.



परळी येथील केदारेश्वराचे देवळांतील नक्षीकाम. पृ० ९

REFBK-0003795

३८८५